राज्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना
प्रति क्विंटल रु. २००/- अनुदान देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्रमांक: सपस-२०१७/प्र.क्र.०५/२४ स
मंत्रालय, विस्तार, मुंबई-३२
दिनांक:-२६ ऑक्टोबर, २०१७

संदर्भ:- १) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
क्रमांक :- सपस-२०१७/प्र.क्र. ०५/२४ स, दिनांक १० जानेवारी, २०१७
२) पणन संचालनालयाचे क्र. पणन-३/सोयाबीन अनुदान-सन २०१७-१८/२९५१/२०१७,दिनांक १८/०७/२०१७ चे पत्र

प्रस्तावना:-

खरीप हंगाम २०१६-२०१७ मध्ये राज्यात पिकाच्या लागवडीखालील क्षेत्रात झालेली वाढ आणि त्याचबरोबर मान्सूनचा समाधानकारक पाऊस यामुळे राज्यात सोयाबीनच्या उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ झालेली होती. परिणामत: सोयाबीनची बाजारातील आवक वाढवून दरात घसरण झालेली होती. त्यामुळे राज्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याच्या दृष्टीने माहे ऑक्टोबर,२०१६ ते डिसेंबर,२०१६ या महिन्यामध्ये राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये सोयाबीन विक्री केलेल्या शेतकऱ्यांना अनुदान देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये ऑक्टोबर,२०१६ ते डिसेंबर,२०१६ या महिन्यामध्ये ज्या शेतकऱ्यांनी सोयाबीन विक्री केली आहे. अशा पात्र शेतकऱ्यांना प्रति क्विंटल २००/- व जास्तीत जास्त २५ क्विंटल प्रति शेतकरी याप्रमाणे अनुदान मंजूर करण्यासाठी रुपये १०८,६४,२९,००० /- (अक्षरी रुपये एकशे आठ कोटी,चौसष्ट लाख,एकोनतीस हजार फक्त) इतका निधी आकस्मिकता निधीतून शासन उपलब्ध करुन देत आहे.

२. या योजनेंतर्गत होणारा खर्च नमूद लेखाशिर्षाखाली उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आकस्मितता निधीतून भागविण्यात यावा.

मागणी क्रमांक व्ही-२
२४२५ सहकार
१९५ सहकारी संस्थांना सहाय्य
(०१) सहकारी संस्थांना सहाय्य
(०१)(०३) सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना अर्थसहाय्य (अनिवार्य) (२४२५ २५३३)
३३ अर्थसहाय्य
आकस्मिकता निधी संकेतांक (८००० ७४३१)

३. या योजनेंतर्गत प्राप्त होणाऱ्या सर्व प्रस्तावांची छाननी करुन जिल्हानिहाय पात्र लाभार्थ्यांना अनुदान वितरीत करण्यासाठी पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना शासनाच्या वतीने प्राधिकृत करण्यात येत आहे. पणन संचालक,पुणे यांनी सदर अनुदानाची रक्कम शासकीय कोषागारातून आहरित करुन, या रक्कमेचे शासनाच्यावतीने लाभार्थी शेतक-यांना कोणत्याही परिस्थिती दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१७ पुर्वी वितरण करुन आपला अहवाल शासनास सादर करावा.

४. या रकमेच्या देयकावर आकस्मिकता निधी, अग्रीम वित्त विभाग, शासन क्रमांक आकनि-२०१७/प्र.क्र.४/ अर्थसंकल्प-१३, दिनांक २४ ऑक्टोबर,२०१७ अन्वये मंजूर असे लाल शाईने लिहावे व ते लाल शाईने अधोरेखित करावे.

५. या शासन निर्णयान्वये मंजूर केलेल्या अर्थसहाय्याचा विनियोग ज्या कारणास्तव मंजूर केला आहे, त्याच कारणासाठी करत असल्याबाबत पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी खात्री करावी आणि यासंदर्भातील अनुपालन अहवाल शासनास वेळोवेळी सादर करावा.

६. सदरचा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१७/अर्थसंकल्प-१३, दिनांक २४ ऑक्टोबर,२०१७ अनुसार त्यांच्या मान्यतेने व सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१०२६१४५४५८५६०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Valvi Kalu Gonya

Digitally signed by Valvi Kalu Gonya
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-Op,Marketing And Textile Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=714701fc3db9c38a46f4cd82e1e450b51a9e92eede8c323934f82edb538d3b20, cn=Valvi Kalu Gonya
Date: 2017.10.26 14:42:53 +05'30'

(का.गो.वळवी)

उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,

२) मा. मंत्री (सहकार, पणन व वस्त्रोद्योग) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई,

३) मा. राज्यमंत्री (पणन) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई,

४) मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,

५) अपर मुख्य सचिव (पणन) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,

६) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे,

७) पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे,

८) कार्यकारी संचालक,महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे

९) सर्व विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था,

१०) सर्व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,

११) महालेखापाल, महाराष्ट्र-१ /२ (लेखा व अनुज्ञेयता / लेखापरिक्षा), मुंबई/नागपूर,

१२) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,

१३) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे,

१४) वित्त विभाग, व्यय-२/अर्थसंकल्प-१३, मंत्रालय, मुंबई-३२

१५) कार्यासन अधिकारी, १७ स, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई,

१६) निवड नस्ती २४ स, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.